## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ/७२३/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. गणपत गोकुळ मुळूक | सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था (दुग्ध) पुणे,<br>जिल्हा दुग्धव्यावसाय विकास अधिकारी पुणे कार्यालय, खडकी, पुणे | विभागीय उपनिबंधक,<br>सहकारी संस्था (दुग्ध) पुणे,<br>जिल्हा दुग्धव्यावसाय विकास अधिकारी पुणे कार्यालय, खडकी, पुणे |

**(सुनावणी दिनांक- २४/०७/२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १४/०२/२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये सुनावणी होऊन निर्णयाबाबत आदेश नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. तथापि, अपिलार्थी यांनी लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १४/०९/२०२४ | १. श्री. म्हातोबा दूध उत्पादन संस्था मर्या., आखरवाडी, ता. खेड, नोंदणी क्र. पी.एन.ए.के.एच.डी./ए.जी.आर.२९३२ सन २००७-०८ दि. ११/०३/२००७ संदर्भात<br>२. जिदुविअ/पुणे/क-१/विसर्जीत मध्यंतरीय आदेश/२/दि. २०/०१/२०१६ व त्यावर दि. १०/०२/२०१६ रोजी संस्थेच्या खुलासा बाबतचा निर्णय<br>३. जा. क्र. जिदुविअ/पुणे/क-१/दूध श्री म्हातोबा/खेड २०२४/३४६२/ दि. २५/०६/२०२४ चा पत्रव्यवहार इ. माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती मिळालेली नाही. तसेच अपिलाथी यांनी सुनावणी नंतर सदर अपिलासंदर्भात लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले. सदर निवेदनात, "दि. २४/०७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली त्याच दिवशी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी

दुग्धव्यवसाय विकास अधिकारी पुणे कार्यालय यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक यांना व पुणे जिल्हा दुध उत्पादक संघ यांना खाते बंद व दूध पुरवठा बंद करणेबाबत लेखी पत्र दिले. त्यामुळे संस्थेच्या दूध उत्पादक यांचे बँकेकडे व दूध उत्पादक संघाकडे दुध पुरवठा कामी खातेवर जमा होणारी रक्कम, संबंधिताकडे असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. कार्यवाहीचे आदेश व्हावे. अशी विनंती." नमूद केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांनी अपिलार्थीस दि. १५/१०/२०२४ रोजीच्या पत्राने म्हातोबा सह. दूध उत्पादक संस्था मर्या, आखरवाडी (चास) ता. खेड या संस्थेची नोंदणी रद्द केल्याबाबत कळविल्याचे सुनावणी वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांनी सुनावणी वेळी अवगत केले की, दि. २३/१२/२०२४ रोजीच प्रथम अपील निकाली काढले आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी अपिलार्थीस दि. १५/१०/२०२४ रोजीच्या पत्राने माहिती दिल्याचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २३/१२/२०२४ रोजी अपील निकाली काढल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी सदर दूध उत्पादक संस्था रद्द झालेली नसून संस्थेला दूध पुरवठा करीत असल्याचे आयोगाच्या व सुनावणी वेळी उपस्थित असलेल्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याही निर्देशनास आणून दिले.

प्रस्तुत प्रकरणी, अपिलार्थी दुध उत्पादक संस्था रद्द झालेली नाही ही बाब खरी आहे. परंतु याबाबत जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी पुणे कार्यालय, खडकी, पुणे यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र - अ मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने व विहित तरतुदीनुसार देय असणारी माहिती बाबत योग्य ती तपासणी व कार्यवाही करुन अचुक माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थी यांना देण्यात यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) पुणे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी पुणे कार्यालय, खडकी, पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ/७२३/२०२५/पुणे 10266/2025 दिनांक - 26/11/25